# वाशिम जिल्हा पोलीस गॅझेट
## अंक १६ वा
## दिनांक - १७/०४/२०१७ ते २२/०४/२०१७
## पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम.
## जावक क्रमांक 3551 दिनांक 12 MAY 2017

---

## भाग- १ :- बदली/पदोन्नती/नेमणुक :-

### बदली:-

बदली-परीपत्रक

आदेश क्रमांक पोअवा/आस्था/सर्व सा.बदल्या/३०३७/२०१७ वाशिम दि.१८/४/२०१७ अन्वये पोलीस कर्मचारी यांचे सन-२०१७ सर्वसाधारण बदली बाबत परीपत्रक.

१) पोलीस शिपाई ते सपोउपनि यांच्या वार्षिक सर्वसाधारण बदल्या खालील तरतुदी विचारात घेवुन जिल्हा स्थरीय पोलीस आस्थापना मंडळाद्वारे बदल्या करण्यात येणार आहे.त्यामुळे सर्व पोलीस कर्मचारी यांनी त्यांचे विनंती अर्ज याकार्यालयास दिनांक ३०/४/२०१७ पर्यंत प्रभारी अधिकारी यांचे मार्फतीने सादर करावेत.

२) पोलीस दलातील कोणत्याही पो.स्टे./शाखा व युनिट मधिल पोशि ते सपोउपनि या पदावर एखादया कर्मचा-यांची पदस्थापना झाल्यानंतर तो कर्मचारी पदस्थापनेच्या ठिकाणी सामान्यत: जास्तीत जास्त पाच वर्षे कालावधिपर्यंत राहु शकतो तथापी प्रशासकीय कारणास्तव व अन्य कारणास्तव संबंधित आस्थापना मंडळाच्या शिफारशी नुसार आणि संबंधित पोशि यांची बदली सामान्य पदावधी पुर्ण होण्यापुर्वी देखील होवु शकते.

३) पोलीस कर्मचा-यांना एका पो.स्टे.व शाखेमध्ये नेमणुकीच्या दिनांकापासुन पाच वर्षाचा कालावधि ठेवण्यात आला आहे. पाच वर्षापेक्षा अधिक सेवा झाली असल्यास त्यांची तात्काळ अन्यत्र बदली करण्यात येईल.

४) दि.३१/५/२०१७ पर्यंत ५ वर्ष पुर्ण करण्या-या पोलीस कर्मचारी बदली करण्यात येणार आहे.

५) पोलीस कर्मचा-यांच्या त्यांच्या स्वग्राम असलेल्या तालुक्यात नेमणुक /बदली करता येणार नाही.पो.मु.येथे काम करीत असलेल्या संवर्गातील कर्मचा-यांसाठी हा नियम लागु असणार नाही.

६) दि.३१/५/२०१७ पर्यंत ५ वर्ष पुर्ण करण्या-या पोलीस कर्मचारी यांनी दिनांक ३०/४/२०१७ पावेतो अर्ज सादर करावे.केवळ पसंतीच्या ठिकाणीच बदली करणे हा शासकीय कर्मचा-यांचा हक्क नाही. त्यामुळे कर्मचा-यांनी पसंतीच्या ठिकाणी बदली करण्यास आग्रही असु नये.बदली करीता नमुद केलेल्या पसंतीच्या ठिकाणी बदली करण्या बाबत सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील.मात्र रिक्त पद उपलब्ध नसल्यास प्रशासकीय दृष्टी कोनामतुन इतर ठिकाणी रिक्त पदावर बदली करण्यात येईल.

७) बदलीस पात्रा कर्मचा-यां व्यतीरीक्त बदली साठी विनंती अर्ज सोबतचे सहपत्र ब नमुन्यात या कार्यालयास दि.३०/४/२०१७ पुर्वी पाठवावे विनंती करणा-या पोलीस कर्मचा-यांनी विनंती नुसार बदली मिळणे हा त्यांचा हक्क नाही. रिक्त पदे विनंतीचे स्वरुप विचारात घेवुन प्रकरणाच्या 'गुणवत्ते नुसार बदली बाबतचे विनंती अर्ज निश्चीतपणे विचारात घेण्यात येतील.

८) बदलीसाठी पसंतिची ३ ठिकाणे देतांना मुळ स्वग्राम असलेल्या तालुक्यात नेमणुक/बदली अनुज्ञेय नसल्यामुळे मुळ तालुक्याचा उल्लेख पसंतीच्या ठिकाणात करु नये वरील बाब दुर्लक्षित करुन जे कर्मचारी अर्जामध्ये पसंतीचे ठिकाण नमुद करतील त्यांची विनंती अमान्य करण्यात येईल.

९) बदली बाबत पोलीस कर्मचारी यं ानी अर्जाव्यतीरीक्त अन्य कोणत्याही व्यक्तीकडुन संदर्भ/विनंती करु नये अशी विनंती अन्य कोणही मार्फत पाठवु नये पाठविल्यास त्यांचा विचार करण्यात येणार नाही. तसेच विनंती जागी बदली मिळणे हा त्यांचा अधिकार नसुन प्रशासकीय सोईनुसार व उपलब्ध रिक्त पदांचीस्थिती विचारात घेवुन बदलीचा विचार केला जाईल.पसंतीचे ठिकाणी बदली मिळविणे करीता कोणत्याही प्रकारे दबाव वा शिफारस असल्यास संबंधित

कर्मचा-यां विरुध्द गैरवर्तणाची दखल घेवुन मनासे नागरी सेवा (शिस्त व अपीले) आणि वर्तणुक नियमाखाली गंभिर कार्यवाही करण्यात येईल.तसेच त्यांचे सेवापटात त्या बाबत नोंद केली जाईल.

१०) पोलीस कर्मचारी वर्षभरात केंव्हाही वेगवेगळया कारणास्तव बदलीसाठी अर्ज करतात. हे योग्य नाही बदलीसाठी एप्रिल व मे हा कालावधि निश्चीत केल्यामुळे याच वेळात प्रामुख्याने बदलीची विनंती विचारात घेण्यात येईल.अन्यवेळी प्रशासकीय दृष्टया अशी विनंती मान्य करता येणार नाही.त्यामुळे भविष्यात पोलीस कर्मचा-यांनी सर्वसाधारण ठरलेलया वेळे व्यतीरीक्त बदलीसाठी अर्ज,विनंती करु नये त्या विचारात घेतल्या जाणार नाही.याचीनोंद घ्यावी.

११) पोलीस कर्मचा-यांच्या अर्जामध्ये त्यांची पो.स्टे./शाखेतील नेमणुकीचे दिनांक तैनाती रजिस्टरमधुन तपासुन खात्रा करावी,त्यामध्ये काही अपवादात्मक परीस्थीती उदभवल्यास सर्वस्व जबाबदारी संबंधित पोलीस कर्मचारी व संबंधित ठाणेदार व शाखा प्रमुख प्रभारी अधिकारी यांची राहील. तसेच ठाणेदार/प्रभारी शाखा अधिकारी यांनी अभिप्राय देतांना विनंती मध्ये नमुद बाबी ख-या आहेत किंवा कसे? या बाबत अभिप्राय नमुद करावेत.फक्त शिफारस करु नये ठाणेदाराचे अभिप्राय असल्याखेरीज अर्ज विचारात घेतल्या जाणार नाही.बदलीसाठी अर्ज सोबतच्या नमुन्यामध्ये सादर करावे. अपुर्ण व त्रोटक साध्या कागदावरील अर्ज विचारात घेण्यात येणार नाही.

## पदोन्नती/नेमणुक :-निरंक.

## भाग-२ रजा

आदेश क्रमांक पोअवा/आली-२/सिक रजा/पोहवा-४६४/३१०१/२०१७ वाशिम दिनांक १९/४/२०१७ अन्वये पोहवा/४६४ रामदास भालेराव नेमणुक पो.मु.वाशिम यांचे दिनांक २५/८/२०१५ ते दि.४/६/२०१६ पावेतो २८५ दिवस सिक कालावधिच्या अहवालामध्ये अध्यक्ष स्थायी वैद्यकीय मंडळ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अकोला दिलेल्या अभिप्राया नुसार २८५ दिवस अर्जित रजा मंजुर करण्यात येत आहे.

## भाग -३ :- बढती/पगार. निरंक

## भाग -४ :- बक्षिस:- निरंक.

## भाग -५ :- शिक्षा/परवानगी :-निरंक

## भाग -६ :- निलंबन/प्रशिक्षण व इतर :-

## निलंबन :-निरंक.

## प्रशिक्षण :-

आदेश क्रमांक पोअवा/आस्था/परीस्त से.प्रशि.नि/३०२६/२०१७ वाशिम दिनांक १७/०४/२०१७ अन्वये दिनांक १७/०४/२०१७ ते दि.१८/०४/२०१७ रोजी या आस्थापनेवर महिलां विरुध्दचे अपराध या विषयावरील परीक्षेत्रीय स्तरांवर सेवांतर्गत प्रशिक्षण आयोजीत करण्यात येत आहे सदर प्रशिक्षणा करीता उपस्थीत अधिकारी यांना त्यांची राहण्याची व्यवस्था,चहाजेवणा करीता सेवांतर्गत प्रशिक्षण खात्यामध्ये जमा असलेली रक्कम सेवांतर्गत प्रशिक्षण निधीमधुन(२८-Professional service) रुपये -१५०००/-(अक्षरी रुपये पंधरा हजार फक्त मंजुर करण्यात येत आहे.सदरची रक्कम त्वरीत पोलीस निरीक्षक कल्याण शाखा वाशिम यांना सदर प्रशिक्षणा करीता अदा करण्यात यावे.

आदेश क्रमांक पोअवा/आशा-४/ड्रायव्हर-प्रशिक्षण/निवड/पोहेकॉ-३३९/२०१७/३०५३ वाशिम दिनांक १८/०४/२०१७ अन्वये एम.आय.ए. पुणे येथे ५ दिवसाचे व्हीआयपी कार ड्रायव्हर चे प्रशिक्षण दिनांक २४/४/२०१७ ते २८/४/२०१७ पावेतो आयोजीत करण्यात आलेले आहे. सदरचे प्रशिक्षणा करीता चालक पोहेकॉ/३३९ माणिक खंडारे नेमणुक पो.स्टे.मालेगांव यांची निवड करुन त्यांना पाठविण्यात येत आहे.

आदेश क्रमांक पोअवा/आशा-४/प्रशिक्षण-ICT निवड/मपोकॉ-७/जिवीशा/२०१७/३०५२ वाशिम दिनांक १८/०३/२०१७ अन्वये मपोकॉ/७ बेबी राठोड नेमणुक जिवीशा वाशिम यांची MIA पुणे येथे इन्टेलीजन्स कलेक्शन टेक्निक्सचे प्रशिक्षण दिनांक २३/४/२०१७ ते २८/४/२०१७ पावेतोचे प्रशिक्षणा करीता निवड करुन पाठविण्यात येत आहे.

आदेश क्रमांक पोअवा/आशा-४/इनसर्च वॅच नं-६१/नाशिक/निवड-२ कर्म/२०१७/३१२७/वाशिम दिनांक २१/४/२०१७ अन्वये गुन्हे अन्वेषन प्रशिक्षण केंद्र नाशिक येथे सत्र क्रमांक ६१ चे प्रशिक्षणा करीता दिनांक २५/४/२०१७ ते दि.२९/४/२०१७ पावेतो ५ दिवसाचे प्रशिक्षण आयोजीत करण्यात आलेले आहे. सदरचे प्रशिक्षण करीता पो.स्टे.मालेगांव येथील-०२ कर्मचारी, तसेच पो.स्टे.रिसोड येथील ०१ कर्मचारी यांची निवड करुन त्यांना प्रशिक्षणा करीता तात्काळ रवाना करावे.
आदेश क्रमांक पोअवा/आशा-४/खंडाळा/निवड -६ कर्मचारी/प्रशिक्षण/उपविपोअ कार्या/३१३०/२०१७ वाशिम दिनांक २१/४/२०१७ अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी यांची पोलीस प्रशिक्षण केंद्र खंडाळा यथे दिनांक २४/४/२०१७ ते २८/४/२०१७ पावेतो करीता उपविपोअधिकारी कार्यालय वाशिम येथील-०२,कारंजा-०२,मंगरुळपिर-०२ कर्मचारी असे एकुण ६ कर्मचारी यांची निवड करुन पाठविण्यात येत आहे.

## इतर :-

आदेश क्रमांक पोअवा/आली-२/अतिप्रदान/पोहवा/३१२८/२०१७ वाशिम दिनांक २१/४/२०१७ अन्वये पोहवा/२५८ मो.खालीद मो.शरीफ नेमणुक पो.स्टे.शिरपुर यांचे सेवापटातील आक्षेपाची पुर्तता करुन त्यांचे सेवापट वेतन पडताळणी करीता लेखा अधिकारी वेतन पडताळणी पथक अमरावती यांचे कडे पाठविले असता त्यांनी त्यांचे आक्षेप चिठठ्ी मध्ये पुन्हा त्यांचे अतिप्रदान बाबत विवरणपत्र सोबत जोडावे या बाबत आक्षेप घेतला आहे. नमुद पोहवा/२५८ मो.खालीद मो.शरीफ यांची या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा आली-२/सुधारीत वे.नि.ASI-२५८/खालीद १९८५/२०१७ दिनांक २३/०२/२०१७ अन्वये वेतननिश्चीती करण्यात आलेली आहे.परंतु त्यांचे अतिप्रदान बाबत विवरणपत्र आपणाकडुन आस्थापना शाखेत प्राप्त झाले नाही. तरी पोहवा/२५८ मो. खालीद मो.शरीफ नेमणुक पो.स्टे.शिरपुर यांची अतिप्रदान वसुली किती आहे त्याबाबतचे वसुलीचे विवरणपत्र तयार करुन तात्काळ आस्थापना शाखेस देण्यात यावे.जेणे करुन त्यांचे सेवापटातील आक्षेपाची पुर्तता करुन त्यांचे मुळ सेवापट वेतन पडताळणी पथक अमरावती यांचेकडे पाठविणे सोयीचे होईल.

(मोक्षदा पाटील)
पोलीस अधिक्षक वाशिम.

प्रति,

संगणक कक्ष प्रमुख पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम यांना माहितीस व आवश्यक त्या कार्यवाहीस संगणक विभाग नेटवर प्रसिध्दी देणे कामी.

२/- संगणक कक्ष प्रमुख यांनी सदरचे जिल्हा पोलीस गॅझेट अंक हे पोलीस अधिक्षक वाशिम यांचे "संकेतस्थळावर" सर्वां करीता उपलब्ध करुन देण्यात यावे.तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी/सर्व ठाणेदार/सर्व शाखा प्रमुख जिल्हा वाशिम यांचे संके तस्थळावर "ई-मेल द्वारे" सर्व संबंधितांना माहितीस/सि.बी.-१ लिपीक यांना योग्य कार्यवाहीस.

*****************